कामगार कल्याण विभाग,
पुणे महानगरपालिका.
जावक क्र.:-एलओ/ ३९६७
दिनांक :-४/१०/२०२१

**-:कार्यालय परिपत्रक:-**

**विषय :-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६० (अ)**
विनिर्दिष्ट माहिती प्रकटीकरण (Disclosure of specified information)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६० (अ) मधील विहित तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या विविध विभागांनी नमूद केलेल्या, विनिर्दिष्ट माहितीचे प्रकटीकरण करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६० (अ) मधील उपरोक्त तरतुदीनुसार महापालिकेतील सर्व विभागांनी त्यांच्या विभागाची माहिती प्रसिध्द करुन सदर माहिती दर तीन महिन्यांनी अद्ययावत करणे बंधनकारक आहे. सदर माहिती सर्व विभागांनी त्यांच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर व महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच याबाबत यापुर्वी देखील वेळोवेळी कार्यालय परिपत्रक प्रसृत करुन पुर्तता करणेबाबत, अवगत करण्यात आले होते. तथापि काही विभागांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६० (अ) अंतर्गत प्रसिध्द केलेली माहिती अद्यापही अद्ययावत केली नसल्याचे, दिसून येत आहे.

तरी, महापालिकेच्या सर्व खातेप्रमुख, यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभागांची माहे सप्टेंबर-२०२१ अखेर पर्यंतची कलम ६० (अ) ची माहिती पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.३१/१०/२०२१ अखेरपर्यत अपलोड करुन, त्याचा पूर्तता अहवाल इकडील कार्यालयाकडे पाठविणेस विनंती आहे.

4-10-2021
(शिवाजी दौंडकर),
मुख्य कामगार अधिकारी,
पुणे महानगरपालिका.

प्रत /-सर्व मा.खातेप्रमुख/सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस. . . .